# ध्वज डिझाइन करा




ध्वज डिझाइन करण्यासाठी खाली काही विषय दिलेले आहेत ज्यामध्ये एखाद्या काल्पनिक देशाबद्दलची माहिती दिली आहे. त्यातील कोणताही एक विषय निवडा आणि दिलेल्या काही सोप्या नियमांना ध्यानत घेऊन त्या काल्पनिक देशासाठी आकर्षक ध्वज डिझाइन करा.

### ध्वज डिझाइन करण्यासाठीचे विषय (इयत्ता ४ ते ९ साठी)

- एक असा देश ज्यामध्ये फक्त कीडे किंवा वैज्ञानिक किंवा परग्रहवासी (एलियन) असतात.
- एक असा देश ज्यामध्ये फक्त वनस्पती आणि झाडे आहेत.
- एक असा देश ज्यामध्ये फक्त उडू शकणारी माणसे राहतात.
- किनारपट्टी असलेला देश जिथे मासेमारी हा मुख्य व्यवसाय आहे.
- एक गुप्त देश ज्याबद्दल काहीही माहिती नाही.

### ध्वज डिझाइन कार्याचे नियम

- तुमचा ध्वज निवडलेल्या विषयाशी संबंधित असणे आवश्यक आहे.
- तुम्ही केवळ ३ किंवा त्यापेक्षा कमी रंगांचा वापर करू शकता.
- ध्वजावर कोणताही मजकूर लिहीण्यास परवानगी नाही.
- तुमचा ध्वज सोपा असावा आणि दूरवरून दिसला पाहिजे.
- तुमचा ध्वज वेगळा असला पाहिजे आणि इतर ध्वजांची नक्कल टाळा.

प्रतिमा स्त्रोत: फ्रीपिक पब्लिक डोमेन

# ध्वज डिझाइन करा

**ध्वज डिझाइन करण्यासाठीचे विषय (दहावी ते पदवी–पदव्युत्तरसाठी)**

- असा देश जिथे संगीत हा मुख्य व्यवसाय आहे.
- एक देश ज्याचे बोधवाक्य “विविधतेत एकता” हे आहे.
- तीन बेटांचा समावेश असलेला देश.
- असा देश ज्यामध्ये वर्षभर सूर्यप्रकाश असतो.
- एक असा देश जिथे सर्वाधिक जैविक विविधता आहे.



वरील सर्व ध्वज राष्ट्रीय विज्ञानदिन २०२० दरम्यान विद्यार्थ्यांनी डिझाइन केलेले आहेत.

# ध्वज डिझाइन करा

**पार्श्वभूमी**

व्हिज्युअल लिटरसी (दृश्यात्मक साक्षरता) ही एखाद्या व्यक्तीला प्रतिमा आणि दृश्य माध्यमे प्रभावीपणे शोधण्यास, अर्थ लावण्यास, मूल्यांकन करण्यास आणि वापर व तयार करण्यास सक्षम करते (ACRL, 2012). या प्रकारची साक्षरता मुलांना कल्पनांचे क्रम लावणे आणि स्वःताची अभिव्यक्ति सुधारण्यास मदत करते (Flynt & Brozo, 2010). तसेच वाचन व लेखन साक्षरता सुधारण्यासाठी (Stewig, 1994) आणि गंभीर विचारसरणीला (Williams, 2007) प्रोत्साहन देण्यासाठीदेखील याचा उपयोग होऊ शकतो. व्हिज्युअल लिटरसी शिकवण्याचे अनेक मार्ग आहेत ज्यात व्हिज्युअल कम्युनिकेशन (दृश्य माध्यमांच्या मदतीने संभाषण करणे) कौशल्य महत्वाचे आहे. प्रतीक अथवा सांकेतिक चिन्ह किंवा ध्वज डिझाइन करणे इ. यांसारखी डिझाइन कार्ये या कौशल्याच्या विकासास प्रेरणा देऊ शकतात.

ध्वज डिझाइन करण्याचे कार्य विद्यार्थ्यांना दिलेल्या डिझाइन मर्यादेत प्रतिकांचा वापर आणि मजकूर व चित्रांच्या मांडणीचा सराव करण्याची संधी देते. ध्वज म्हणजे "कपड्याचा एक तुकडा सामान्यत: आयताकृती आणि खांबाच्या एका काठाशी जोडलेला ज्याचे स्वरूप एका देशाचे किंवा गटाचे प्रतिनिधित्व दर्शवते किंवा त्याचा विशिष्ट अर्थ असतो" (Cambridge Dictionary). म्हणून, ध्वज दिसायला आणि लक्षात ठेवायला सोपे असतात आणि बहुतेकदा त्यांच्यावर अमूर्त चिन्हे असतात ज्या सखोल अर्थ दर्शवितात. या उपक्रमात विद्यार्थी दिलेल्या देशासाठी एक वेगळी ओळख निर्माण करताना वेगवेगळ्या आकार, रचना, माप आणि रंगाचे संयोजन करू शकतात ज्यामुळे व्हिज्युअल कम्युनिकेशन कौशल्याला चालना मिळू शकते.

## References


Association of College & Research Libraries Board of Director. (2012). Visual literacy competency standards for higher education. *College & Research Libraries News, 73*(2), 97-104.

Flynt, E. S., & Brozo, W. (2010). Visual literacy and the content classroom: A question of now, not when. *The Reading Teacher, 63*(6), 526-528.

Stewig, J. W. (1994). First graders talk about paintings. *Journal of Educational Research, 87*(5), 309-316.

Williams, T. L. (2007). 'Reading' the painting: Exploring visual literacy in the primary grades. *The Reading Teacher, 60*(7), 636-642.

**Websites**

Cambridge Online Dictionary: https://dictionary.cambridge.org/dictionary/english/flag